कार्यालय सहदिवाणी न्यायाधिश (क. स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली

क्रमांक जडसंग्रह/७८७/२०२४, दिनांक १४/१०/२०२४

## दरपत्रक/निविदा सुचना

याद्वारे कळविण्यात येते की, सह दिवाणी न्यायालय (क.स्तर), गडचिरोली या कार्यालयातील वापरात असलेल्या इंव्हर्टरच्या ०२ बॅट-या खराब झालेल्या असल्यामुळे इंव्हर्टरकरीता खालील वर्णन केल्यानुसार बॅट-यांची स्थानिक बाजारातुन खरेदी करावयाची असल्याने त्याबाबत ईच्छुक प्रतिष्ठानांनी तुलनात्मक दराची सिलबंद निवीदा मा. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), गडचिरोली यांच्या नावाने दिनांक २१/१०/२०२४ च्या सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत सह दिवाणी न्यायालय (क.स्तर), गडचिरोली येथे सादर करण्यात यावे. तसेच लिफाफ्यावर ' **इंव्हर्टरच्या बॅटरी खरेदी बाबतची निविदा** ' असे नमुद करावे.

| अ.क्र. | विवरण | संख्या |
|---|---|---|
| १ | Tubuler Battery 150 AH/12 V<br>(Exide/Okaya or any other company) | ०२ |

**अटी व शर्ती :-**

१. वरील विवरणामध्ये नमुद केले इन्व्हेटर बॅट-या स्पेशिफिकेशन प्रमाणे सह दिवाणी न्यायालय (क.स्तर), गडचिरोली येथे पुरवठा करणे अनिवार्य राहील. व त्यांचे दर सर्व करासहित असले पाहिजे. याप्रमाणे निवीदामध्ये स्पष्टपणे नमुद करावे.

२. निविदामध्ये इन्व्हेटर बॅट-याचा गॅरंटी कालावधी स्पष्टपणे नमुद करणे अनिवार्य आहे.

३. इन्व्हेटर बॅट-या व गॅरंटी व वारंटी कार्ड सह दिवाणी न्यायालय (क.स्तर), गडचिरोली येथे जमा करणे अनिवार्य आहे.

४. इन्व्हेटर बॅट-यांच्या गॅरंटी व वारंटी कार्ड कालावधीमध्ये काही बिघाड निर्माण झाल्यास किंवा इन्व्हेटर बॅट-या व्यवस्थित कार्य करीत नसल्यास, तक्रार केल्यापासुन दहा दिवसाचे आत नविन इन्व्हेटर बॅट-या पुरविणे आवश्यक राहील.

५. कोणत्याही प्रकारच्या आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.

६. वरिल साहित्य पुरविण्याचे आदेश दिल्यास, दिलेल्या मुदतीतच पुरविले पाहिजे अन्यथा आदेश रद्द समजण्यात येईल याची जबाबदारी संबंधीत प्रतिष्ठानाची राहील.

७. सदरहु नमुद साहित्याचा पुरवठा सह दिवाणी न्यायालय (क.स्तर), गडचिरोली येथे करणे अनिवार्य असुन स्थापीत करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्याकरीता वेगळा खर्च मिळणार नाही.

..२..

८. निविदा कोणत्याही कारणास्तव रद्द करणे किंवा मागणी संख्येत वाढ किंवा घट करणे याबाबतचे पुर्ण अधिकार मा.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), गडचिरोली यांना राहातील.

९. साहित्याचा पुरवठा विहीत मुदतीत केल्यानंतर व साहित्य सुस्थितीत पुरवठा झाल्याची कार्यालयास खात्री पटल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार रक्कमेचे प्रदान केल्या जाईल.

१०. दरपत्रकामध्ये जी.एस.टी. क्रमांक नमुद करावे तसेच सोबत पॅन कार्ड तसेच स्थानिक प्रशासनाचे व्यवसाय प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडावी, अन्यथा दरपत्रक/निवीदा रद्द करण्यात येईल.

15/10/24

सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)
गडचिरोली.

१. सदर टेंडर नोटीसची प्रत जिल्हा न्यायालय गडचिरोलीचे वेबसाईटवर ऑनलाईन प्रसिध्द करण्यात यावी.

२. टेंडर नोटीसची प्रत बेलिफामार्फत, न्यायालयीन ईमारतीचे प्रवेशद्वाराजवळील, जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर तसेच एक प्रत सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी गडचिरोली यांचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करुन अहवाल संबंधीत विभागास सादर करावा.

15/10/24

सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय (क.स्तर)
गडचिरोली.